**मालदीवच्या 60व्या स्वातंत्र्याच्या वर्षपूर्तीला पंतप्रधानांची मुख्य अतिथी म्हणून उपस्थिती (26 जुलै 2025)**

26 जुलै 2025

आपल्या माले भेटीदरम्यान, पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी हे मालदीवच्या 60 व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहिले. भारतीय पंतप्रधानांनी मालदीवच्या स्वातंत्र्य दिन समारंभाला मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहण्याची पहिलीच वेळ होती. राष्ट्रपती मुइज्जू यांनी निमंत्रित केलेले राज्य किंवा सरकारच्या प्रमुखाच्या स्तरावरील पंतप्रधान मोदी हे पहिलेच विदेशी नेते ठरले आहेत.

2. मालदीवचे महामहिम राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मूइज्जू यांच्या समवेत पंतप्रधानांनी रिपब्लिक स्क्वेअर येथे स्वातंत्र्य दिन संचलनाचं निरीक्षण केलं. याप्रसंगी पंतप्रधानांनी मालदीवच्या जनतेला आणि सरकारला हार्दिक शुभेच्छा वर्तविल्या. या उत्सवात मालदीवच्या राष्ट्रीय संरक्षण दलांनी आणि इतर स्थानिक तुकड्यांनी उत्साही संचलने सादर केली. तसेच आधुनिक राष्ट्र म्हणून मालदीवच्या कामगिरीवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

3. पंतप्रधानांनी राष्ट्रपती मुइज्जू आणि मालदीवच्या जनतेचे त्यांच्या अगत्यपूर्वक निमंत्रणाबद्दल आभार मानले. 'मुख्य अतिथी' म्हणून स्वातंत्र्य दिनाच्या समारंभात त्यांचा सहभाग उभय देशांमधील द्विपक्षीय संबंधांमध्ये एक मैलाचा टप्पा ठरला आहे. वर्ष 2025 मध्ये भारत आणि मालदीव दरम्यानच्या राजनयिक संबंध प्रस्थापनेची 60 वी वर्षपूर्ती साजरी केली जात आहे.

माले

26 जुलै 2025